जानेवारी - २०२४ * अंक- ७ वा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2023-24





आर.आय.प्रेसिडेंट
रो. गॉर्डन आर. मॅकइनली



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
रो. आशा वेणुगोपाल



प्रेसिडेंट
रो. मनोज जोशी



ऑन.सेक्रेटरी
रो. अॅड. हेमंत भंगाळे



बुले.कमिटी चेअरमन
रो. स्वाती ढाके

CREATE HOPE in the WORLD

## संपादकीय....

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

सर्वप्रथम सर्वांना नवीन वर्षाच्या आरोग्यमय शुभेच्छा! ईश्वराने हे दिलेले आयुष्य फार अनमोल आहे. पण ते फुकट मिळालेले आहे, न मागता फुकटात मिळालेल्या गोष्टीची किंमत कुठे असते मानवाला ? खरंतर माणूस जगतो कशासाठी? तर जगण्यासाठीच! जीवन कठीण नाही, पण बाजारू व्यवस्थेत हे जगणं आपण हरवून बसलो आहेत. चला तर मग नवीन वर्षाचा संकल्प करू या की निखळ आनंद घेत आयुष्य जगू आणि समाजातील गरजू आणि पीडित लोकांपर्यंत रोटरी मार्फत पोहोचून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करण्याचा प्रयत्न करू या.

जानेवारी हा 'व्होकेशनल मंथ' आहे हा मंथ साजरा करण्यामागे कारण हे आहे की, सभासदांनी त्यांचे व्यवसाय रोटरी तत्त्वानुसार चालववे क्लब ने विकसित केलेल्या व्यवसायिक सेवा प्रकल्पांना पाठिंबा देणे आपल्या अध्यक्षांनीच या तत्वाला अनुसरून २५० ग्रामीण लोकांना त्यांच्या कंपनीत रोजगार दिला आहे त्यांच्या कार्याची दखल घेत सेवाधर्म प्रतिष्ठान तर्फे मा. कलेक्टर जळगाव आयुष प्रसाद यांच्या हस्ते अध्यक्ष मनोज जोशी यांचा सत्कार केला. आपल्या क्लब तर्फे व्होकेशनल कमिटी चेअरमन डॉक्टर शुभदा कुलकर्णी यांच्या प्रोत्साहनाने फर्स्ट लेडी विनया जोशी यांनी प्रौढ साक्षरता वर्ग चालवला त्यांचे अनुभव पान नंबर पाच वर दिलेले आहेत. 'यशाचे मूल्यांकन तुम्ही किती उंची गाठली यावर होत नसून तुम्ही आपल्या सोबत किती जणांना नेता यावर होत असते' याच विचारांचे आपले नवनिर्वाचित अध्यक्ष अॅड.सागर चित्रे आणि मानद सचिव पराग अग्रवाल यांची वर्ष २०२४–२५ साठी एक मताने निवड करण्यात आली आहे. पुढील वर्ष हे आपल्या क्लबचे अमृत महोत्सवी वर्ष आहे आणि 'बचपन' ही थीम नवनिर्वाचित अध्यक्षांनी आपल्या क्लबला दिलेली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याबद्दल आपल्या अपेक्षा उंचावल्या आहेत. त्यांचे व त्यांच्या संपूर्ण टीमचे हार्दिक अभिनंदन आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम,

सर्व सदस्यांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभकामना हे वर्ष आपणास शुभदायी व उत्कर्षाचे जावो हीच प्रार्थना. जानेवारी महिना व्होकेशन मंथ आहे. आपण व्होकेशनल सर्विस ग्रुप स्थापन करू शकतो हा ग्रुप असा असेल की तो समाजाच्या तळागाळाच्या लोकांना त्यांच्या कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यास मदत करू शकतो ज्याच्यामुळे ही लोकं आत्मनिर्भर होऊ शकतात. आपल्या जीवनामध्ये अनेक लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आपल्याला मदत करत असतात. उपयोगी पडत असतात अशा सर्व लोकांची जर कृतज्ञता व्यक्त करायची असेल तर व्होकेशन मंथ सारखा दुसरा महिना नाही आपण अशा सर्व लोकांना उचित अवसर उपलब्ध करून देऊ शकतो. आणि तोच प्रयत्न या महिन्यात आपण करणार आहोत. या महिन्यात मेडिकल कमिटीच्या अंतर्गत आपण धानोरा येथे एक मोठा मेडिकल चेकअप कॅम्प घेणार आहोत, शाळांचे मध्ये पण जाऊन आपण विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप करणार आहोत मोतीबिंदूचे ऑपरेशन्स पण करणार आहोत. या सर्व प्रोजेक्ट करता आपली मेडिकल कमिटी तिचे सदस्य आणि स्वतः रो. पी पी डॉ. तुषार फिरके मेहनत घेत आहेत. नॉन मेडिकल कमिटीच्या अंतर्गत आपण स्मशानभूमी येथे एक अंत्यसंस्कार विधी करता लागणारा लोखंडी रॅक उभा करणार आहोत, अपंग मुलाला व्हीलचेअर उपलब्ध करून देत आहोत, व्होकेशन कमिटी अंतर्गत आपण आपल्या इंटरॅक्ट स्कूलचे विज्ञान प्रदर्शन हे पहिल्यांदा भरवणार आहोत त्याकरता आम्ही खूप उत्साहीत आहोत आणि आपण सर्वांनी सुद्धा या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमात भाग घ्यावे ही माझी विनंती. डिसेंबर महिन्यामध्ये आपण एसटी वर्कशॉप मध्ये चालक आणि वाहक यांचे डोळ्यांच्या तपासण्या केल्या त्याबद्दल मेडिकल कमिटी चेअरमन रो.डॉ. तुषार फिरके यांना मनापासून धन्यवाद त्याचबरोबर नॉन मेडिकल कमिटी अंतर्गत आपण दोन प्रोजेक्ट केले पहिला प्रोजेक्ट सायकल वाटप आणि दुसरा प्रोजेक्ट रेल्वे स्टेशनला स्ट्रेचरची भेट याकरता नॉन मेडिकल कमिटी चेअरमन रो.जितेंद्र ढाके यांचे पण मनापासून अभिनंदन आणि धन्यवाद. इंटरॅक्ट कमिटीतर्फे आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धा आणि वादविवाद स्पर्धा याबद्दल आणि त्याच्या सुंदर आयोजनाबद्दल रोटेरियन डॉ. काजल फिरके मॅडम यांना धन्यवाद आणि अभिनंदन. शेवटी सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे सर्व रोटेरियन ज्यांनी उत्स्फूर्तपणे प्रोजेक्टमध्ये आणि साप्ताहिक सभांमध्ये आपली उपस्थिती आणि योगदान दिले त्याबद्दल त्यांचे शतशः धन्यवाद.

आणखीन महत्त्वाचे सांगायचे राहूनच गेले की यावर्षी रोटरी कॉन्फरन्स जी सहा आणि सात जानेवारीला होणार आहे तिच्याकरता आपल्या क्लब तर्फे ४३ सदस्य उपस्थित राहणार असून ही एक अभिमानाची गोष्ट आहे म्हणून सर्व सदस्यांना पण धन्यवाद.

– रो. मनोज जोशी

# नोव्हेंबर महिन्यातील साप्ताहिक सभा




* **८ डिसेंबर–** रोजी आयोजित साप्ताहिक सभेत बॉक्स क्रिकेट 'धमाल सिझन–३' या स्पर्धेच्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.




* **१५ डिसेंबर–** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही इलेक्शन मिटींग होती. यामध्ये २०२४–२५ साठी रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष म्हणून ॲड.सागर चित्रे आणि मानद सचिव म्हणून रो.पराग अग्रवाल यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड.सागर चित्रे यांनी त्यांच्या कार्यकाळातील बोर्ड ऑफ डायरेक्टर जाहीर केले. तसेच त्यांच्या कार्यकाळातील त्यांच्या कामाचा आढावा घेतला.



* **२२ डिसेंबर–** रोजी आयोजित साप्ताहिक सभा चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. चर्चासत्राचा विषय होता 'चला निसर्ग जपू या....' रो.आसिफ मेमन सोबत डॉ.लीना पाटील व डॉ.सुनिल सुर्यवंशी यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला होता.




* **२९ डिसेंबर–** रोजी आयोजित साप्ताहिक सभे मध्ये प्रश्नोत्तराचा कार्यक्रम घेण्यात आला. ''रोगप्रतिबंध आणि उपचार' ही डिसेंबर महिन्यातील रोटरी डेसिग्नेट मंथ ची थीम होती, म्हणून या विषयावर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# डिसेंबर महिन्यातील प्रोजेक्टस्




**✻ १५ डिसेंबर –** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे उडान प्रोजेक्ट अंतर्गत ५० सायकलीं चे वाटप-रो.डि.३०३० च्या प्रांतपाल सौ.आशाजी वेणुगोपाल संकल्पित उडान या उपक्रमाद्वारे विविध शाळां मधील विद्यार्थी व विद्यार्थीनींना करण्यात आले याप्रसंगी अध्यक्ष मनोज जोशी, मा.सचिव ॲड. हेमंत भंगाळे,असि. गव्हर्नर नितीन इंगळे,नॉन मेडिकल चेअमन जितेंद्र ढाके, प्रेम कोगटा, राघवेंद्र काबरा, नंदकिशोर जाखेटीया, योगेश गांधी,संदीप शर्मा, ॲड. सागर चित्रे, सौ. स्वाती ढाके, संध्या महाजन, डॉ.शुभदा कुलकर्णी, पराग अग्रवाल, नितीन काळूखे, रितेश जैन, असिफ मेमन, उपस्थित होते, या उपक्रमाला प्रेम कोगटा–५, किशोर मंडोरा–५, नंदकिशोर जाखेटे–५, कवरलाल संघवी–१०, सौ.स्वाती ढाके–१०, किरण बेंडाळे–५,संदीप शर्मा–५, संध्या महाजन–२, राजेश वेद–२, डॉ.जयंत जहागीरदार–१ यांनी सायकली ची मदत केली.

**✻ २७ डिसेंबर –** रोजी रोटरी क्लब जळगाव यांचे इंटरॅक्ट कमिटी तर्फे चित्रकला स्पर्धा आणि वादविवाद स्पर्धा आयोजित केलेली होती, या स्पर्धेत जळगाव मधील विविध शाळेतील ४३ विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत व १८ विद्यार्थ्यांनी वादविवाद स्पर्धेत भाग घेतला. याप्रसंगी इंटरॅक्ट कमिटीचे चेअरमन रो.डॉ.सौ.काजल फिरके यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना कलर बॉक्स भेट म्हणून दिले. चित्रकलेचे परीक्षक म्हणून सुबोध सराफ व सुशील चौधरी यांनी तर वादविवाद स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ.सौ.शुभदा कुलकर्णी व शैलजा पप्पू यांनी काम पाहिले तसेच सूत्रसंचालन सौ.स्वाती ढाके यांनी केले. यावेळी रोटरी क्लब चे अध्यक्ष मनोज जोशी, मा. सचिव ॲड. हेमंत भंगाळे, इंटरॅक्ट कमिटी अध्यक्षा डॉ. काजल फिरके,तसेच सदस्य प्रेम कोगटा, सौ.स्वाती ढाके, जितेंद्र ढाके, योगेश गांधी, संदीप शर्मा, रितेश जैन, मकरंद डबीर, विश्वजीत बऱ्हाटे, पूजा बऱ्हाटे उपस्थित होते.






**✻ २८ डिसेंबर –** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे जळगाव आगारातील एसटी ड्रायव्हर, कंडक्टर व कर्मचारी यांची मोफत डोळ्यांची तपासणी करून आय ड्रॉप्सचे वितरण करण्यात आले. रोटरी सदस्य नेत्ररोग तज्ञ डॉ.तुषार फिरके यांनी १२२ कर्मचारीची डोळ्यांची तपासणी करून मोफत आय ड्रॉपचे वाटप केले व डोळ्यांची निगा कशी राखावी यावर मार्गदर्शन देखील केले. याप्रसंगी आगार प्रमुख संदीप पाटील, विभागीय वाहतूक अधिकारी दिलीप बंजारा व कामगार अधिकारी कमलेश भावसार यांनी रोटरी क्लबचे आभार मानले, यावेळी रोटरी क्लब चे अध्यक्ष मनोज जोशी, मानद सचिव ॲड.हेमंत भंगाळे, प्रकल्प प्रमुख तेजस पवार, सदस्य संदीप शर्मा तसेच आगारातील कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते..

**✻ २९ डिसेंबर –** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे जळगाव रेल्वे स्टेशन वर दोन स्ट्रेचर भेट देण्यात आले, सदरील प्रोजेक्ट चे संपुर्ण प्रायोजकत्व आपले क्लब चे सदस्य रो.विजय जोशी यांनी स्वीकारलेले याप्रसंगी अध्यक्ष मनोज जोशी, मा.सचिव ॲड.हेमंत भंगाळे, नॉन मेडिकल चेअरमन पीपी.जितेंद्र ढाके, रितेश जैन, तसेच स्टेशन प्रबंधक श्री.कौस्तुभ चौधरी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# व्होकेशनल मंथ

**माजी अध्यक्ष रो. डॉ. तुषार फिरके**



व्होकेशनल सर्व्हिस म्हणजे रोटरी सर्व व्यवसायांचा पाठपुरावा करण्यासाठी आयडियल ऑफ सर्व्हिसच्या अनुप्रयोगास प्रोत्साहन आणि समर्थन देण्याचा मार्ग आहे. ऑब्जेक्ट ऑफ रोटरी हे रोटरीच्या उद्देशाचे आणि रोटेरियन्सच्या जबाबदाऱ्यांचे तात्विक विधान आहे. व्यावसायिक सेवेची संकल्पना दुसऱ्या ऑब्जेक्टमध्ये रुजलेली आहे, जी रोटेरियन्सना 'प्रोत्साहन आणि पालनपोषण' करण्याचे आवाहन करते: ती उद्दिष्टे आहेत: व्यवसाय आणि व्यवसायांमध्ये उच्च नैतिक मानकांना प्रोत्साहन देणे आणि वाढवणे, सर्व उपयुक्त व्यवसायांची योग्यता ओळखणे, रोटेरियनच्या व्यवसायाला समाजाची सेवा करण्याची संधी म्हणून सन्मानित करणे. सेवेचा आदर्श वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामुदायिक जीवनात लागू करणे. सेवेच्या आदर्शात एकजूट होऊन व्यापारी आणि व्यावसायिक स्त्री–पुरुषांच्या जागतिक फेलोशिपद्वारे आंतरराष्ट्रीय समज आणि सद्भावना आणि शांतता प्रगत करणे. पॉल हॅरिसने लिहिले: 'प्रत्येक रोटेरियन हा रोटरीचा आदर्शवाद आणि त्यांचा व्यापार किंवा व्यवसाय यांच्यातील जोडणारा दुवा आहे'. ही रोटरी क्लब आणि त्याचे सदस्य या दोघांचीही सामायिक जबाबदारी आहे.

क्लबची भूमिका समाजाशी व्यवहार करताना स्वतःच्या कृतींद्वारे आणि सदस्यांना त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांचा समुदायाच्या सेवेत वापर करण्यास सक्षम करणाऱ्या प्रकल्पांच्या विकासाद्वारे उद्दिष्टेंची अंमलबजावणी करणे आणि प्रोत्साहित करणे आहे. रोटरीच्या तत्त्वांनुसार स्वतःचे आणि त्यांचे व्यवसाय चालवणे आणि क्लबने विकसित केलेल्या व्यावसायिक सेवा प्रकल्पांना पाठिंबा देणे ही सदस्यांची भूमिका आहे.

जानेवारी दरम्यान, रोटरी सेवेच्या या महत्त्वाच्या मार्गावर लक्ष केंद्रित करण्यासाठी रोटेरियन्सना प्रोत्साहित केले जाते. व्यावसायिक सेवेवर चर्चा केल्याने असे प्रकल्प होऊ शकतात जे केवळ रोटेरियन लोकांची नैतिक चेतना आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करत नाहीत तर त्यांच्या समुदायातील प्रतिभा देखील विकसित करतात. व्यावसायिक सेवा महिना हा वर्षभर चालणाऱ्या व्यावसायिक सेवा उपक्रमांना सुरुवात करण्याची संधी आहे, रोटरी चर्चा ते पुरस्कार ते सामुदायिक प्रकल्पांपर्यंत.

व्यावसायिक सेवा महिन्यात कारवाई करण्याचे ६ मार्ग आहेत. व्यावसायिक सेवा समुदायाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आमची अनन्य कौशल्ये आणि कौशल्ये वापरून इतरांना सक्षम करण्यासाठी आणि इतरांना कौशल्ये आत्मसात करण्यात किंवा परिष्कृत करण्यात आणि त्यांच्या व्यावसायिक संधींना पुढे करण्यात मदत करण्यासाठी आम्हाला आवाहन करते. विविध व्यवसाय आणि पार्श्वभूमीतील लोकांना एकत्र आणून, रोटरी सर्व कौशल्ये आणि व्यवसायांचे महत्त्व ओळखते. एक दोलायमान रोटरी क्लब आपल्या समुदायातील व्यवसाय, संस्था आणि व्यवसाय प्रतिबिंबित करतो, अनुभव आणि दृष्टीकोनातील विविधता स्वीकारतो.

तुमचे व्यावसायिक जीवन आणि व्यावसायिक सेवा हातात हात घालून जातात. रोटेरियन्सची दुहेरी जबाबदारी असते: त्यांच्या क्लबमध्ये त्यांच्या व्यवसायांचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांच्या कामाच्या ठिकाणी रोटरीच्या आदर्शांचे उदाहरण देतात. जानेवारी हा रोटरीचा व्यावसायिक सेवेचा महिना आहे, व्यावसायिक सेवेचा लाभ घेण्याचा उत्तम काळ! आपण कारवाई कशी करू शकता?

# प्रौढ साक्षरता वर्ग एक सुवर्णसंधी

रो. विनया जोशी



मला जेव्हा यांनी विचारलं की प्रौढ साक्षरता वर्गात जाऊन शिकवशील का? तेव्हा माझा पहिला प्रश्न होता की मला याचा अनुभव नाहीये आणि तिथं कोण शिकायला येईल हे सुद्धा माहित नव्हतं. त्यातल्या त्यात हा वर्ग एका अशा ठिकाणी घ्यायचा होता की जिथे आपण सहसा जाण्याचा विचार करत नाही. मला तसा लग्ना अगोदर शाळेत शिकवण्याचा अनुभव होता. वरून यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याला प्रौढ साक्षरता वर्ग चालवताना नेहमी खर्च येतो तो वाचवण्याचा प्रथमतः हेतू होता. रो. शुभदा कुलकर्णी मॅडम यांनी खूप माहिती दिली व या निर्णयाची पाठराखण सुद्धा केली. त्यामुळे मला जास्त हुरूप आला. वर्धिष्णु संस्था व त्याच्या संचालिका सौ. प्रणाली दंडवते यांनी आम्हाला जागा व प्रौढ साक्षरता वर्गाकरिता गरजू महिलांचा शोध घेण्यास मदत केली. त्याबद्दल त्यांचे मी मनापासून आभार व्यक्त करते. पहिल्या दिवशी सुमारे पंधरा महिलांनी या वर्गास हजेरी लावली त्या सर्वांना आपण क्लब तर्फे शैक्षणिक साहित्य मोफत पुरवले. दुसरे दिवशी सर्व महिलांची ओळख झाल्यावर असे लक्षात आले की काहींना घड्याळ पण कळत नाही कोणी महिला कधीच शाळेत गेल्याने व काही महिला शिक्षणाची एखाद दोन वर्ष करून शाळा सोडून दिल्या. त्यांच्याशी बोलल्यावर असे लक्षात आले की याच्यामागे दोन प्रमुख कारणं आहेत पहिलं म्हणजे आर्थिक कारण आणि दुसरं म्हणजे सामाजिक त्यात जातीय भेदभाव किंवा लैंगिक भेदभाव या दोन्ही गोष्टी स्पष्टपणे दिसत होत्या. माझी अशी इच्छा आहे की आधुनिक भारतात वरील कारण प्रमाणे कुठल्याही व्यक्तीचा विद्याभ्यास थांबायला नको, तरच आपण जगात एक श्रेष्ठ राष्ट्र म्हणून उदयास येऊ. महिलांचा छान प्रतिसाद मिळत होता त्यांचा पहिला कल हा अक्षर ओळख आणि आकडे ओळख याच्याकडे दिसला व आम्ही त्याप्रमाणेच त्यांना शिकवण्यास सुरुवात केली. प्रथम जे शब्द रोजच्या जीवनात त्यांच्यासमोर येतात त्या शब्दांची पहिले ओळख करून देण्यात आली व त्यात आम्ही बऱ्याच प्रमाणात यशस्वी सुद्धा झालो नंतर घड्याळ व बँकेचे जुजबी व्यवहार करणे हे सुद्धा त्यांना शिकवलं. त्यात बऱ्याच जणींचा असा अनुभव होता की बँकेत त्यांना निरक्षरतेमुळे फसवणुकीलाही समोर जावं लागलं होतं. म्हणून काही बँकेचे प्राथमिक व्यवहारही आम्ही त्यांना शिकवले. दिवाळीच्या अगोदर निम्म्या महिलांनी येणं बंद केलं त्याचा आम्ही कारण शोधण्यावर असं लक्षात आलं की त्यांना रोजगाराचे काही साधन त्या महिन्यांमध्ये उपलब्ध झाले व म्हणून त्या महिनाभर येणार नाहीयेत असो त्यांचा उर्वरित अभ्यास आम्ही दिवाळीनंतर पूर्ण करू. या प्रौढ साक्षरता वर्गातून एक गोष्ट लक्षात आली की शिकायची इच्छा सर्वांची असते, पण कौटुंबिक जबाबदारी आणि आर्थिक दुर्बलता ही प्रामुख्याने अडचण असते. मला आपल्या रोटरी क्लब जळगाव ने दिलेल्या संधीबद्दल मी त्यांचे आभार मानते व मला एक दुसरं विश्व बघायला आणि अभ्यासायला मिळालं ज्याच्यामुळे माझा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला असं मी मानते.

पुन्हा एकदा सर्वांचे धन्यवाद रोटरी प्रणाम.

# बोर्ड ऑफ डायरेक्टर २०२४-२५

अध्यक्ष – रो. ॲड. सागर चित्रे
मानद सचिव– रो. पराग अग्रवाल
खजिनदार– रो. उदय पोतदार

उपाध्यक्ष– रो. गिरीश कुलकर्णी
सहसचिव– रो. सुभाष अमळनेरकर
सार्जन्ट ऑफ ऑर्म – रो. रितेश जैन

## संचालक मंडळ

पीपी रो. छबीलदास शहा
पीपी रो.राघवेंद्र काबरा
पीपी रो. जितेंद्र ढाके
रो. डॉ. शमा सराफ
रो. दिपक चांदोरकर
रो. किशोर तलरेजा


पीपी.रो. प्रेम कोगटा
पीपी रो. जयंत जहागीरदार
रो. मनोज जोशी
रो. ॲड. हेमंत भंगाळे
रो. प्रदीप खिवसरा
रो. श्याम अग्रवाल

पीपी रो.किशोर मंडोरा
पीपी रो. तुषार फिरके
रो. डॉ. शुभदा कुलकर्णी
रो. योगेश गांधी
रो. आसिफ मेमन
रो. चंदन महाजन

---

# रोटरी लिडरशीप इन्स्टिटट्युट चे प्रशिक्षण तीन दिवसीय शिबीर

**रो. किशोर जाखेटीया**



नाशिकला नुकतेच रोटरी लिडरशीप इन्स्टिट्युट चे प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. त्यासाठी मी गेलो होतो. प्रेसीडेन्ट रो.परेश चिटणीस यांच्या टीमने सुंदर आयोजन केले होते. प्रशिक्षक म्हणून पीडीजी रो.जॉर्ज सुंदरराजन तामीळनाडू, पीडीजी रो.राजीवजी शर्मा, भुसावळ, पीडीजी रो.डॉ.जॉनसन फर्नांडीस गोवा, पीपी रो.प्रकाशजी सारस्वत गोवा, पीपी.रो.बोंद्रे ठाणे, पीपी रो.अमोलजी काबरा नाशिक, पीपी.रो.अजय नरकेसरी यांनी अतिशय सुंदर मार्गदर्शन केले.

रोटरी बद्दल समज गैरसमज दूर झालो, उद्‌बोधक माहिती मिळाली. पीडीजी रो.जॉर्ज यांचे मार्गदर्शन मला सर्वाधिक आवडले. भोजनानंतर त्यांनी सुंदर गाणे देखील प्रस्तुत केले व विशेष म्हणजे सर्व प्रशिक्षक स्वखर्चाने आले होते ही उल्लेखनीय बाब आहे. जसे सागरातून मोती, रत्ने काढायची असतील तर सागरात दूरवर खोलात जावे लागते. तसेच रोटरीचा आनंद घ्यायचा असेल तर प्रत्येक रोटेरीयनी अशा कार्यक्रमाला उपस्थिती देणे आवश्यक आहे आणि ज्यांना रोटरी मध्ये नेतृत्व करायचे असेल तर त्यांच्यासाठी अति आवश्यक आहे. शिबिरात बरेच नवीन मित्र मिळालेत. माझ्या बरोबर रूम मेट म्हणून पीपी. रो. भांडारकर, अमळनेर होते. इतर क्लब मधील ॲक्टीवीटी बद्दलही बरीच माहिती मिळाली.

# प्रोजेक्टस् चे क्षणचित्रे......





















## जीवेत् शरदः शतम्...!

१) ३ जानेवारी रो. डॉ. प्रज्ञा जंगले

२) ९ जानेवारी रो. अशोक आहुजा

३) १८ जानेवारी रो. शशिकांत कुलकर्णी

४) १९ जानेवारी पीपी कॅ.रो.मोहन कुलकर्णी

५) २० जानेवारी रो. उदय पोतदार

६) २४ जानेवारी रो. नितीन काळुंखे

७) २५ जानेवारी रो. काजल फिरके

८) २७ जानेवारी रो. मनोज जोशी

९) ३१ जानेवारी रो. विलास कुलकर्णी

## नांदा सौख्यभरे...

१) १२ जानेवारी रो. ॲड. सागर चित्रे

२) १९ जानेवारी पीडीजी डॉ.रो. सी. सिकची

३) २३ जानेवारी रो. राजेश यावलकर

४) २५ जानेवारी रो. राजू आडवाणी

५) २६ जानेवारी रो. रणवीरसिंग कलसी

६) २८ जानेवारी रो.दीपिका & दीपक चांदोरकर




## अभिनंदन!

- सेवा धर्म परिवारातर्फे आयोजित कार्यक्रमात रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष मनोज जोशी यांचा सत्कार जिल्हाधिकारी मा.आयुषप्रसाद यांच्या हस्ते करण्यात आला.
- रोटरी क्लब जळगाव एलिट तर्फे ४५ + रोटेरियन्स्साठी 'लिजेंडस् लीग' ही बॉक्स क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मा.सचिव ॲड.हेमंत भंगाळे यांना तीन मॅचेस् मध्ये मॅन ऑफ द मॅच पारितोषिक मिळाले तर ॲड.सागर चित्रे यांना एका मॅचसाठी मॅन ऑफ मॅच पारितोषिक मिळाले.
- रो.गिरीश कुलकर्णी यांच्या धर्मपत्नी सौ.आदिती कुलकर्णी यांना वल्लभदास वालजी वाचनालयातर्फे आयोजित अभिवाचन स्पर्धेच्या खुल्या गटात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.
- आंतरराष्ट्रीय करिअर समुपदेशक क्लब तर्फे रो.पंकज व्यवहारे यांना व्यावसायिक मान्यता प्राप्त झाली आहे.